# भाषा माणसाला चिरकाल टिकवते:प्रा. कुलकर्णी

## हळबे महाविद्यालयात मराठी भाषा दिनानिमित्त विविध कार्यक्रम संपन्न

▶ दोडामार्ग (प्रतिनिधी)

कोणतीही भाषा ही आपल्या सामर्थ्यावर टिकत असते. ती कोणाच्या श्रेयावर मोठी होत नसते. आपण जीवंत असल्याची ती खुण आहे. माणसाचं दिसणं हे एक व्यक्तीमत्व तर भाषा हे त्याचं दुसरं व्यक्तीमत्व असतं. भाषा माणसाला चिरकाल टिकवत असते. असे विचार ख्यातनाम साहित्यिक व समीक्षक प्रा. कृष्णाजी कुलकर्णी यांनी व्यक्त केले. ते येथील लक्ष्मीबाई सीताराम हळबे महाविदयालयात मराठी भाषा व वाड्.मय मंडळाने 'मराठी भाषा दिना' निमित्त आयोजित केलेल्या काव्यसंमेलनाच्या उद्घाटन प्रसंगी बोलत होते.

कवी कुसुमाग्रज तथा वि.वा.शिरवाडकर यांचा जन्म दिवस 'मराठी भाषा गौरव दिन'म्हणून साजरा केला जातो. यानिमित्त महाविदयालयात भित्तीपत्रक, पोस्टर प्रदर्शन व महाराष्ट्र व गोव्यातील निमंत्रित कवींचे कवी संमेलनाचे आयोजन करण्यात आले होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे चेअरमन अभिजीत हेगशेटये तर व्यासपीठावर मुंबईच्या प्रसिध्द कवयित्री संगीता अरबुणे, गोव्यातील चित्रा क्षीरसागर, दीपा मिरींगकर, प्रा. कृष्णाजी कुलकर्णी, गझलकार प्रकाश क्षीरसागर आदी निमंत्रित कवी, प्राचार्य डॉ. व्ही. ए. पाटील, मराठी भाषा व वाड्.मय मंडळाचे प्रमुख प्रा. दिलीप बर्वे उपस्थितीत मराठी



लोकवेद पुस्तकाचे प्रकाशन करताना संस्थाध्यक्ष अभिजित हेगशेटये व अन्य.

भाषा दिनाचे औचित्य साधून महाविदयालयातील विदयार्थ्यांनी संकलीत केलेल्या लोकगीतांचे लोकवेदः दोडामार्ग तालुक्यातील लोकगीते या पुस्तकाचे प्रकाशन मान्यवरांच्या उपस्थितीत, गोवा सरकारी मराठी अकादमीच्या सदस्या कवयित्री पोर्णिमा केरकर यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी आपल्या मनोगतात त्या म्हणाल्या की, भाषा मानवी भावभावनांचे कंगोरे नजाकतीने उलगडणारी, माणसांना माणसांशी जोडणारी, संदेशवहनाचे महत्वपूर्ण कार्य करते. बोली भाषेतून लोक साहित्याचा भाषिक ठेवा जतन करण्याचे, महाविदयालयाचे हे कार्य उल्लेखनिय आहे. प्राचार्य डॉ. व्ही. ए. पाटील यांच्या संकल्पनेतून, प्रा. दिलीप बर्वे यांच्या परिश्रमातून व विद्यार्थ्यांच्या सहकार्यातून तयार झालेले लोकवेद हे आगामी लेखकांसाठी दिशादर्शक ठरेल.

दीप प्रज्वलन व कवी कुसुमाग्रज आणि कविवर्य मंगेश पाडगांवकर यांच्या प्रतिमा पुजनाने कार्यक्रमाची सुरूवात झाली. संस्थेचे चेअरमन अभिजीत हेगशेटये यांच्या हस्ते प्रमुख पाहुण्याचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. यावेळी कवयित्री पौर्णिमा केरकर यांची गोवा सरकारी मराठी अकादमीवर सदस्य म्हणून निवड झाल्याबद्दल महाविद्यालयातर्फे त्यांचा शाल व श्रीफळ देऊन चेअरमन अभिजीत हेगशेटये यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. आपल्या अध्यक्षीय भाषणात त्यांनी मराठी भाषेपुढील आव्हाने व ती पेलण्यासाठी आपल्यांला करावी लागणारी उपाययोजना याबद्दल मार्गदर्शन केले.

कवी संमेलनात कवयित्री दीपा मिरींगकर यांनी सादर केलेल्या बाळं माझं मोठं झालं या कवितेने सर्वांनाच अंतर्मुख होऊन चिंतन करायला लावते. पौर्णिमा केरकर, संगीता अरबुणे, चित्रा क्षीरसागर यांनीही आपल्या कविता सादर करून टाळ्या मिळविल्या. गझलकार प्रकाश क्षीरसागर यांनीही आपल्या गझला सादर केल्या.

विद्यार्थ्यांमध्ये राजेश नाईक, कामोद नाईक, विद्या धर्णे, सायली गवस, अक्षय राऊत यांनी मंगेश पाडगांवकरांना सुमनांजली म्हणून त्यांच्या कविता सादर केल्या. प्रास्ताविकात प्राचार्य डॉ. व्ही. ए. पाटील यांनी कार्यक्रमामागची भूमिका व उद्दीष्टे स्पष्ट केली. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी व विदयार्थ्यांनी अथक परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कवयित्री चित्रा क्षीरसागर व प्रा. सोपान जाधव तर आभार मराठी भाषा व वाड्.मय मंडळ प्रमुख प्रा. दिलीप बर्वे व डॉ. पी. डी. गाथाडे यांनी मानले.